सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

क्र.९]  बुधवार, दिनांक ७ जून २०२३ : ज्येष्ठ १७, शके १९४५  [किंमत ०.०० रु.]

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

# भाग एक-अ औरंगाबाद विभाग

१

**प्र. वरीष्ठ नियोजनकार (नविन शहरे) तथा नगररचना अधिकारी यांजकडून**

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र (मर्यादित)**

**सूचना**

**क्र. सिडको/न.र.अ./औ.बाद(औ.झा.क्षे.)/२०२३**

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-३००६/३८१/ सीआर-२४६/२००६/युडी-३० दि. ३ ऑक्टोबर २००६ नुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४०(१), उप कलम (ब) (या पुढे उक्त अधिनियम असे संबोधिलेले) अन्वये प्राप्त अधिकारानुसार औरंगाबाद झालर क्षेत्राकरिता (या पुढे उक्त अधिसूचित क्षेत्र असे संबोधलेले) शहर व औद्योगिक विकास महामंडळाची (यापुढे महामंडळ अथवा सिडको असे संबोधिलेले) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे.

आणि ज्या अर्थी, उक्त अधिनियमध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करून महामंडळाने कलम ३०(१) अन्वये उक्त अधिसूचित क्षेत्रासाठीची प्रारूप विकास योजना राज्य शासनाकडे दि. २ जुलै २०१४ व त्यानंतर दि. २१ जुन २०१६ रोजी मंजुरीकरीता सादर केली होती.

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभागाच्या अधिसूचना क्र. टीपीएस-३०१४/४१९/सीआर-१५९(अ)/२०१४/एसएम/ युडी-३० दि. ८ नोव्हेंबर २०१७ नुसार जोडपत्र-ब मध्ये नमूद केल्याप्रमाणेचे सारभूत स्वरूपाचे फेरबदल वगळून जोडपत्र-अ मधील फेरबदलांसह विकास योजनेस मंजूरी दिली आहे. सदर जोडपत्र-ब मध्ये नमूद काही सारभूत स्वरूपाच्या फेरबदलांकरीता अद्याप शासनाकडून मंजूरी मिळणे बाकी आहे.

आणि ज्या अर्थी, सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरीता औरंगाबाद महानगरपालिकेडून प्राप्त विनंतीच्या अनुषंगाने विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये गट क्र. ९ व १०, मौजे सुंदरवाडी ता. जि. औरंगाबाद या जमिनीवरील विकास योजना आरक्षणांचे जमीनवापर (खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे) बदलून रहिवास वापरामध्ये रूपांतरीत करण्याकरीताचा महामंडळाचा इरादा आहे.

| अ. क्र | जमिनीचे ठिकाण | विकास योजनानुसार अस्तित्वातील जमीनवापर (आरक्षणे) | प्रस्तावीत जमीनवापर |
|---|---|---|---|
| ०१ | गट क्र. ९ सुंदरवाडी | पोलीस स्टेशन, हायस्कूल + खेळाचे मैदान (शासन अधिसूचना दि. २५.०३.२०२२ मधील ईपीक्यू-१ अंतर्गत मंजूरी) | रहिवासी वापर |
| ०२ | गट क्र. १० | डिस्पेन्सरी ॲण्ड मॅटनिटी होम कल्चरल सेंटर, प्रायमरी स्कूल + खेळाचे मैदान+लायब्ररी, खेळाचे मैदान आणि इपीक्यू-४ नुसार स्लॉटर हाऊस, ज्यास अद्यापी मंजूरी बाकी आहे. | रहिवासी वापर |

आणि ज्या अर्थी सिडको संचालक मंडळाने दि. ४ मार्च २०२३ रोजीच्या ठराव क्र. १२६६६ अन्वये उपरोक्त प्रस्तावास मान्यता प्रदान केली आहे. आणि त्या अर्थी आता, संचालक मंडळाच्या सदर ठरावानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम-३७ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून उक्त अधिसूचित क्षेत्रासाठीच्या मंजुर विकास योजनेमधील गट क्र. ९ व १०, मौजे सुंदरवाडी ता. जि. औरंगाबाद येथील वर नमूद केल्याप्रमाणेच विकास योजना आरक्षणांचे जमीनवापर बदलून रहिवासी वापरामध्ये रूपांतरीत करण्याकरीताचा फेरबदल प्रस्तावीत करीत आहे. सदर प्रस्तावित फेरबदल दर्शवणारा विकास योजनेचा भाग नकाशा जनतेच्या निरीक्षणासाठी खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

१) वरिष्ठ नियोजनकार (नविन शहरे) सिडको म. उद्योगभवन, नविन औरंगाबाद.

२) जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

३) सहसंचालक नगर रचना, औरंगाबाद विभाग यांचे कार्यालय, सीबीएस रस्ता, औरंगाबाद.

४) सहा. संचालक नगर रचना, औरंगाबाद यांचे कार्यालय, सिटी प्राईड इमारत, मोंढा नाका, औरंगाबाद.

सदर प्रस्तावीत फेरबदलाकरिता जनतेच्या सुचना/हरकती याद्वारे मागविण्यात येत असून जनतेने त्यांच्या सुचना/हरकती ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आत, कार्यालयीन वेळेत, वरिष्ठ नियोजनकार (नवीन शहरे) सिडको म. उद्योग भवन, नविन औरंगाबाद-४३१००३ यांचे कार्यालयात सादर कराव्यात.

(सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेने) शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित यांच्या संचालक मंडळाच्या आदेशानुसार व नावाने,

दिनांक : २३/०५/२०२३
स्थळ : औरंगाबाद.

**(प्रशांत काकाणी)**
**प्र. वरीष्ठ नियोजनकार (नविन शहरे)**
**तथा नगररचना अधिकारी.**

---

## CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED

## NOTICE

**No. CIDCO/TPO/AUR(AFA)2023/**

Whereas the Government of Maharashtra has, by government Notification No. TPS-3006/381/ CR-246/ 2006/UD-30 dated 3rd October 2006 promulgated in exercise of the powers conferred by Clause (b) of Section-40(1) of teh Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXX VII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and all other powers enabling it in this behalf, appointed the City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (hereinafter referred to as "the Corporation or CIDCO") to be the 'Special Planning Authority' (SPA) for Aurangabad Fringe Area (hereinafter referred to as the "said Notified Area")

And whereas, the Corporation, after following due statutory procedure as outlined in the said Act, Submitted Draft, Development plan for the Aurangabad Fringe Area on 2nd July 2014 and thereafter on 21st June 2016 to the State Government for sanction under section 30(1) of the said Act.

And whereas, the Government of Maharashtra, Urban Development Departmet vide Notification No. TPS-3014/419/CR-159(A)/2014/SM/UD-30 dated 8th November, 2017 accorded sanction to the Development Plan of Aurangabad Fringe Area, with Schedule of Modifications i.e. SCHEDULE-A, excluding the substantial modifications in SCHEDULE-B, attached to the said Notification, Some of the substantial modifications mentioned in the said Schedule-B are yet to be sanctioned by the Government.

And whereas, on request of the Aurangabad Municipal Corporation to implement the project of Affordable Houses on the concept of "Housing for All" under the 'Prime Minister Awas Yojna (Urban)' (PMAY), the Corporation (CIDCO) in the capacity of Special Planning Authority intends to carry out modifications as per Section-37 of the said Act to the sanctioned Development Plan of Aurangabad Fringe Ares, to the extent of converting the landuse of D.P. Reservations (as described in the table below) into Residential zone in lands bearing Gut Nos. 9 and 10, Village - Sundarwadi, Ta, & Dist. Aurangabad.

| Sr. No. | Location/ Site | Existing landuse (D.P. Reservations) | Proposed Landuse |
|---|---|---|---|
| 1. | Gut No. 9, Sundarwadi | Police Station, High School + Playground (sanctioned vide Govt. Notification dated 25.03.2022 for EPQ-1) | Residential Zone |
| 2. | Gut No.10 Sundarwadi | Dispensary &Maternity Home, Cultural Centre, Primary School + Playground + Library, Playground and per EPQ-4 Slaughter House, which is yet to be Sanctioned. | Residential Zone |

And whereas, the Board of Directors of the Corporation, vide Resolution No. 12666 dated 4th March, 2023 has accorded approval to the above proposal.

Now therefore, in accordance with the said Board Resolution of the Corporation in exercise of the powers conferred under Section-37 of the said Act, modifications are proposed to the sanctioned Development plan of Aurangabad Fringe Area, to the extent of converting the landuse of D.P. Reservations as stated above into Residential zone, more specifically shown in the part plan of sanctioned D.P. The part plan of D.P. showing proposed modification is placed in the following offices for inspection of the public :

a) Office of the Senior planner (New Towns), CIDCO Ltd. Udyog bhavn, New Aurangabad.

b) Office of the Collector, Aurangabad.

c) Office of the Joint Director Town Plannong, Town Planning & Valuation Department, Printravel Chowk, C.B.S. Road, Aurangabad.

d) Offcie of the Assistant Director Town Planning, Town Planning & Valuation Department, City Pride Building, Mondha Naka, Aurangabad.

The objections / suggestions are hereby invited on the said proposed modifications from the public and should reach the office of the Senior Planner (New Towns), CIDCO Ltd. Udyog Bhavn, New Aurangabad-431003 during office hours, not later than one month form the date of publication of this notice in the Maharastra Government Gazette.

[with the approval of completent authority]

By order and in the name of the Directors
of the City and Industrial Development
Corporation of Maharashtra Limited,

Date : 23.05.2023

Place : Aurangabad.

(PRASHANT KAKANI)
Senior Planner (New Towns) I/C &
Town Planning of Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, AURANGABAD-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.